MHSO110010182023

**नियमित दिवाणी दावा क्र. ४६३/२०२३**

धनराज मोरे विरुध्द आनंदराव मोरे

**निशाणी क्र. ४६ वरील आदेश**

सदरचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकामी झालेला वारस रेकॉर्डवर घेणेकामी झालेला उशिर माफ होवुन मिळणेसाठी केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र ०४ अरुणा तुळशिराम मोरे या दिनांक २७.०९.२०२४ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांना प्रतिवादी क्र १ आनंदराव याने तसे प्रतिज्ञापत्र करुन गावचे हक्क पत्रामध्ये प्रतिवादी क्र ४ हिच्या मृत्युनंतर नोंद लावून घेतल्याचे वादीस समजले आहे. प्रतिवादी क्र ४ अरुणा हिचा वारस प्रतिवादी क्र १ आनंदराव आहेत व ते दाव्यात समाविष्ठ आहेत.मयत प्रतिवादी क्र ४ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी वादींना ०१ वर्ष ८७ दिवसांचा विलंब झालेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र ४ विरुध्द दावा ॲबेट झाला आहे. प्रस्तुत दावा हा स्थावर मिळकतीबाबत निरंतर ताकीदीसाठी असल्याने मयत वारस रेकॉर्डवर न आणल्यास वादीचे कधीही न करुन येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर घेणेकामी झालेला उशिर माफ होवुन त्यांचे कायदेशीर हयात वारस रेकॉर्डवर येणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांचे विधिज्ञांनी म्हणणे देवुन आक्षेप नोंदवला तसेच योग्य ते आदेश पारीत करण्याची विनंती केली.

४. दावा आणि अभिलेखावरील अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा सदर निरंतरचे ताकीदीसाठी केला आहे. अशा दाव्याकरिता सर्व पक्षकारांचा समावेश दाव्याकामी असणे दाव्याच्या अंतिम निकालाकरिता आवश्यक आहे. सबब प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो :-

**<u>आदेश</u>**

०१ वादीचा अर्ज निशाणी क्र. ४६ मंजुर करण्यात येतो.

०२ प्रतिवादी क्र ०४ अरुणा तुळशिराम मोरे यांच्या वारसांची नावे अभिलेखी घेण्यास झालेला झालेला उशिर हा वादीने रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) पुढील तारखेपर्यंत प्रतिवादीस देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by GAIKWAD MOHINI JANU
Date: 2026.01.01 17:33:59 +0530

दिनांक : ०१/०१/२०२६

(एम.जे.गायकवाड)
४थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
माळशिरस, ता.सोलापूर

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | $4^{th}$ Jt. C.J.J.D & J.M.F.C., Malshiras. |
| **Name of Stenographer** | **:** | Praveen Nagnath Nalla |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 01 / 01 / 2026. |
| **Order uploaded on** | **:** | 01 / 01 / 2026. |